# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाटपन्हाळे

जिमखाना विभाग

वार्षिक अहवाल

(२०१३-१४)

---

- **युवा मॅरेथॉनचे आयोजन :** १२ ऑगस्ट २०१३ रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून संपुर्ण महाराष्ट्रामध्ये युवापिढीमध्ये एच.आय.व्ही./एडस् विरोधी अभियान महाराष्ट्रात राबवले. त्यानिमित्त ग्रामीण रुग्णालय गुहागर व पाटपन्हाळे महाविद्यालयातर्फे तालुकास्तरीय युवा मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयातील पुढील विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळविले.

  **१) कु. स्वप्नील देवजी गोलांबडे – प्रथम क्रमांक**

  **२) कु. सिमा दशरथ मोरे – प्रथम क्रमांक**

  **३) कु. समृध्दी सुनिल चव्हाण – व्दितीय क्रमांक**

  **४) कु. सोनाली अविनाश शिर्के – तृतीय क्रमांक**

- **आंतर -महाविद्यालयीन क्रॉस कंट्री, (कर्जत महाविद्यालय)** : ३१ ऑगस्ट २०१३ रोजी कर्जत महाविद्यालय, कर्जत, जि. रायगड येथे संपन्न झालेल्या आंतर - महाविद्यालयीन क्रॉस -कंट्री स्पर्धेत मुले व मुलींचा संघ सहभागी झाला होता. मुलींच्या संघाने सांघिक गटात तृतीय क्रमांक पटकावला. ६ मुलींना प्रत्येकी **कास्य पदक**, प्रमाणपत्र, १० मार्क व महाविद्यालयासाठी चषक असे पुरस्काराचे स्वरूप आहे. कु. मोरे सिमा दशरथ, जाधव सोनम प्रभाकर, चव्हाण समृध्दी सुनिल, मोरे कल्याणी विष्णू, शिर्के सोनाली अविनाश, वरेकर प्राजक्ता संजय या कास्य पदकाच्या मानकरी ठरल्या.

- **वार्षिक क्रिडा स्पर्धा** : दि. १६ ते १८ डिसेंबर २०१३ मध्ये महाविद्यालयाच्या वार्षिक क्रिडा स्पर्धा विद्यार्थ्यांच्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे उत्साहाने घेण्यात आल्या. कबड्डी, खो-खो, क्रिकेट या सांघिक स्पर्धांमध्ये सर्वच वर्गांनी सहभाग नोंदविला. धावणे, कॅरम, थाळीफेक, गोळाफेक या वैयक्तिक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. सर्व सांघिक स्पर्धांमध्ये प्रत्येक वर्गातील मुलींनी सहभाग नोंदविला.

- **पाटपन्हाळे कबड्डी स्पर्धा** : दि. १ फेब्रुवारी २०१४ रोजी पाटपन्हाळे येथे संपन्न झालेल्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत महाविद्यालयाने सहभाग घेतला होता. सदर स्पर्धेमध्ये महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळविला.

- **रायगड चढणे व उतरणे** : दि. २२/०२/२०१४ रोजी रायगड येथे संपन्न झालेल्या आंतर -महाविद्यालयीन रायगड चढणे व उतरणे या स्पर्धेत महाविद्यालयाचा सहभाग होता. या स्पर्धेत मुलींच्या गटात ०६ विद्यार्थीनींचा सहभाग होता. मुलींच्या गटामध्ये सांघिक गटामध्ये तिसरा क्रमांक मिळविला. याबदल ६ विद्यार्थीनींना प्रत्येकी **कास्य पदक** मिळाले. कु. मोरे सिमा दशरथ, जाधव सोनम प्रभाकर, चव्हाण समृध्दी सुनिल, मोरे कल्याणी विष्णू, शिर्के सोनाली अविनाश, वरेकर प्राजक्ता संजय या विद्यार्थीनींना विद्यापिठाकडून **१० ग्रेस मार्क्स** मिळाले.

२०१३-१४ या वर्षात आंतर-महाविद्यालयीन स्तरावर १२ पदके व तालुकास्तरावर विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेवून महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या नावलौकीकात मोलाची भर घातली.